**<u>नि.दि.दा.क्र.७९/२०१०.</u>**
नि.क्र.१९१ लगत.
दि.२१.०६.२०२५

**<u>उर्वरित उलटतपास प्रतिवादी क्र. १ अ आणि १५ तर्फे विधीज्ञ श्री. बी. व्ही. देशमुख यांच्यामार्फतः–</u>**

११. या दाव्याकामी वादीचे मुखत्यारपत्र केलेले ५०० रुपयाचा स्टॅम्प कोणत्या साली खरेदी केला हे मी सांगू शकत नाही. सदरचा स्टॅम्प शेतीवर असलेल्या दाव्याच्या कामी खरेदी केलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, नि. २२७ वरील स्टॅम्प हा दि. ०३.०८.२०२३ रोजी खरेदी केलेला आहे. सदरचा स्टॅम्प पेपर हा फक्त करारनामा करण्यासाठी खरेदी केला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या स्टॅम्प पेपरवर दि. ०५.०२.२०२४ रोजी मुखत्यारपत्र करुन ते मुंबई येथे नोंदविण्यात आले आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या मुखत्यारपत्राच्या आधारे मला या केसकामी सर्वांच्या वतीने साक्ष देण्याचे अधिकार येत नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुतचा दावा मी जाहिर ठराव व ताकीदीसाठी केलेला आहे. वादीचे मुळ पुरुष राघू उर्फ राघोबा विठू मोरे हे १९५० पूर्वी मयत झालेले आहेत. त्यांना चंद्रकांत, काशिनाथ, विश्वनाथ, तानाजी अशी चार मुले व एक मुलगी चंदाबाई शिंदे असे वारस होते. त्यापैकी फक्त मुलगी हयात आहे. त्यांची सर्व मुले मयत झाले आहेत. राघोबांना असलेल्या वारसांचा फेरफार या केसकामी दाखल केलेला नाही. प्राप्त झाल्यास फेरफार हजर करेन. राघोबा यांच्या नावे त्या काळात झालेलया खरेदीखताचा दस्त आमच्याकडे नसल्यामुळे तो हजर करु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, राघू मयत झाल्यानंतर त्यांच्या पाचही वारसांची नोंदीबाबत फेरफार झालेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, राघू यांच्या खरेदीबाबतचे आणि वारसांबाबतचा फेरफार कधीही झालेला नसल्यामुळे तो या केसकामी दाखल केलेला नाही.

**<u>वकीलांच्या विनंतीवरुन सदर साक्षीदाराचा उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात येतो.</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत.

Sd/–
**(एस.ए.विराणी)**
दि. २१.०६.२०२५. सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
दौंड, जि. पुणे.